# ‘तुका अभंग अभंग’ नाटकातील संत तुकाराम आणि सामाजिक संस्कृती

**श्रद्धा भानुदास गवंडी**

सहा. प्रा., पार्वतीबाई चौगुले कला आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), मडगाव, गोवा.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259832

## ABSTRACT:

विष्णू सूर्या वाघ लिखित‘तुका अभंग अभंग’हे नाटक संत तुकारामांच्या विद्रोही आणि समाजसुधारक व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारे एक परखड वाङ्मय आहे. हे नाटक पारंपरिक भक्तीमूल्यांपेक्षा तुकारामांच्या सामाजिक दृष्टिकोनावर अधिक प्रकाश टाकते. तत्कालीन समाजातील ब्राह्मणसत्ताक व्यवस्थेचा विरोध, जातिभेदाविरुद्धचा संघर्ष, आणि तळागाळातील लोकांसाठी तुकारामांनी केलेले कार्य हे या नाटकाचे केंद्रबिंदू आहेत. नाटकात तुकाराम केवळ एक संत म्हणून नव्हे तर क्रांतिकारी विचारवंत म्हणून उभा राहतो. त्यांच्या तोंडून उच्चारलेले परखड संवाद, आणि समाजातील पाखंडी, भोंदूगिरीवर केलेली टीका, नाटकाला वादग्रस्ततेचे स्वरूप प्राप्त करून देतात. तथापि, हे वाद नाटकाच्या सत्यदर्शी आणि सडेतोड शैलीचे द्योतक आहेत. नाटककाराने तुकारामांचे अभंग, त्यांच्या विचारसरणीचा गाभा, आणि तत्कालीन समाजाची जातीय व मानसिक रचना यांची समांतर मांडणी करत एक प्रभावी सामाजिक चित्र उभे केले आहे. या नाटकाद्वारे आजही समाजातील जातीभेदाचे वास्तव अधोरेखित होते. त्यामुळे‘तुका अभंग अभंग’ही नाट्यकृती केवळ ऐतिहासिक संत चरित्र नसून सामाजिक परिवर्तनाचा एक धारदार साहित्यिक शस्त्र आहे.

## KEYWORDS:

मराठी नाटक, समाजसुधारक तुकाराम, जातिभेद, विद्रोही संत, सामाजिक वास्तव.

## प्रस्तावना

विष्णू सूर्या वाघ या भक्कम पहाडाने केवळ गोमंतकीय मराठी नाट्यसृष्टीत नव्हे तर संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीत 'मायल स्टोन' ठरावे असे नाटक साहित्य सृष्टीला दिले आहे. अर्थातच मराठी नाट्यसृष्टीत ज्या नाटकाने खळबळ माजवली तेच हे नाटक 'तुका अभंग अभंग'.

'तुका अभंग अभंग' हे पार्थ प्रकाशनने सप्टेंबर २००० साली प्रकाशित केलेले दोन अंकी नाटक. ९४ पृष्ठांचे हे नाटक म्हणजे केवळ संत तुकाराम यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उघडणारे नसून ते तत्कालीन ब्राह्मण वर्गाने समाजात माजवलेले स्तोम आणि त्यात भरडले जाणारे तळागाळातील सामान्य माणसे यांचे आहे. या नाटकातला तुकाराम हा विकृत विद्रोही शिवराळ असल्याचे आरोप पूर्वी अनेकांनी केलेत पण खरंतर खऱ्या तुकारामाचा या नाटकात शोध घेतलेला आहे. हे नाटक वादग्रस्त आहे असाही आरोप नाटकावर पूर्वी केला गेलाय पण वादग्रस्त म्हणण्यापेक्षा ते वास्तवता दर्शविणारे आहे याची दखल घेतली पाहिजे. वास्तव नेहमीच कटू असते आणि ते समाजाला पचत नसते. तत्कालीन ब्राह्मण समाजाच्या मक्तेदारीचे येथे उघड दर्शन घडविल्याने त्यावर वादग्रस्ततेचा शिक्का मारण्यात आला. खरं तर हे नाटक म्हणजे तत्कालीन समाजाची वास्तवता आणि त्यातून खऱ्यातुकारामाचा घेतलेला तो शोध आहे.

## नाटकाबद्दल लेखकाचे मत

या नाटकाच्या लेखनाबद्दल मुळात नाटककारालाच प्रश्न पडलेला होता. अनेक विषय अवतीभवती असून सुद्धा साडेतीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका संतांच्या जीवनावर नाटक लिहिण्याची प्रेरणा नक्की कुठून मिळाली? इतर संतापेक्षा तुकोबा वेगळे आहेत. ते केवळ भक्तीत अडकलेले नाहीत तर त्या पलीकडे गेलेले आहेत हा विचार त्यांना गवसला आणि त्यातून ह्या नाटकाचे लेखन त्यांनी केले. नाटककार विष्णू सूर्या वाघ यांना गवसलेला तुकोबा हा केवळ भक्तीत बुडून भावनेने ओथंबलेला नाही आहे तर तो क्रांतीनेही पेटलेला आहे. या तुकोबाचा विठ्ठल हा पंढरपूरच्या विटेवर उभी असलेली पाषाणी मूर्ती नाही तर त्याचा देव माणसात होता. नाटककार विष्णू वाघ यांच्या पूर्वी अनेकानी संत तुकाराम हा विषय हाताळला होता. यात प्रामुख्याने शिरवळकर,

नानासाहेब शिरगोपीकर आणि बाबाजी राणे यांचा उल्लेख लेखकांच्या मनोगतात सापडतो. या व्यतिरिक्त 'तुका म्हणे आता' ही नाट्यकृती पु.ल. नी निर्माण केली. परंतु बऱ्याच ठिकाणी तुकाराम हा भोळा, रडका, अन व्यवहारशून्य दाखविला हीच खंत नाटककार वाघ यांना सतत छळत होती. मराठी जनतेच्या मनात ठसवलेला तुकाराम वेगळा होता आणि भोवतालच्या प्रखर सामाजिक वास्तवातून आत्मभानाचा वेध घेणारा महाकवी तुकाराम मात्र अंधारात फेकला गेला याची जाणीव नाटकाराला स्वस्त बसू देत नव्हती. याच जाणीवेतून अन प्रेरणेपोटी 'तुका अभंग...'जन्माला आले. नाटककाराने या नाटकासंदर्भात तुकोबाचे 'लौकिक' अथवा 'शरीर' व्यक्तिमत्व जाणण्यापेक्षा वङ्मयीन व्यक्तिमत्व जाणून घेण्याची उत्सुकता कबूल केलेली आहे. याच उत्सुकतेतून 'तुका अभंग अभंग' हे आगळे वेगळे नाटक मराठी जनतेला प्राप्त झाले.

**नाटकाचा इतिहास**

एखाद्या महान विचारवंतांचे विचार गर्भकुडीत गाढावे तसे या नाटकाच्या बाबतीत झाले. १९९९ साली गोवा कला अकादमीच्या ३१ व्या राज्य नाट्यस्पर्धेत रुद्रेश्वर, पणजी या संस्थेने या नाटकाचा पहिला प्रयोग केला. सुजाण रसिकांकडून नाटकाला दाद मिळाली. पण स्पर्धेच्या परीक्षकांपासून ते काही 'सो कॉल्ड' हिंदुत्ववाद्यांनी नाटकाचा गळा घोटून तुकोबांचे प्रखर विचारगर्भकुडीत गोठण्याचा प्रयत्न केला. त्या काळात या नाटकाने केवळ गोमंतकात नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्रात खळबळ माजवली. नाटक वादग्रस्त असल्याची टिका होऊ लागली. नाटकातला तुकाराम हा विकृत व शिवराळ आहे. एवढेच नव्हे तर अश्लीलतेचे प्रदर्शन केल्याची टीकाही झाली. नाटकात हिंदुत्वावर टीका आहे, ब्राह्मणांची रेवडी उडवली गेली आहे. यात असलेला मंबाजी म्हणजे संघाचा कोणीतरी पुढारी असे एक ना अनेक आरोप झाले. केवळ आरोप आणि टीका एवढ्यावर ही खळबळ थांबली नाही भले मोठे वादळ झेलावे लागले या नाटकाला.

नाटकातील काही श्लोक, शब्द, प्रसंग, यांना कात्री लावावी, अशा सूचनाही नाटकाराला आल्या. संत तुकारामावर नाटक लिहिणारे तुम्ही कोण लागून गेलात ? महाराष्ट्राचा इतिहास तरी तुम्हाला माहित आहे का? अशा खडतर प्रश्नांना तेवढ्याच ताकदीने नाटककाराने तोंड दिले.

नाटकात तुकारामांच्या हत्येचे दृश्य दाखविले आहे हीच गोष्ट मुळात तत्कालीन समाजाला पचली नाही. तुकारामाचा खून म्हणजे युती सरकारचा खून असेही आरोपझाले. संत तुकारामाच्या हत्येचे पुरावे नाटककाराला विचारण्यात आले, यावर 'तुकारामांना पुष्पक विमान येऊन घेऊन गेले' याचा काय पुरावा? असा तोडीस तोड देणारा प्रत्येक प्रश्न त्याने उपस्थित केला. या नाटकाच्या प्रयोगांतर नाटककार विष्णू सूर्या वाघ, दिग्दर्शक देविदास शंकर आमोणकर, आणि सादरकर्ती संस्था रुद्रेश्वर, पणजी यांनी बऱ्याच खस्ता खाल्ल्या. नाटकाला सेंन्सोरशिप मिळवायलाही अनेक अडचणीतून प्रवास करावा लागला. एक वादग्रस्त वादळ झेलूनही आजही हे नाटक खंबीर उभे आहे. यातच नाटककाराच्या लिखाणाचे श्रेय आहे. आजही रुद्रेश्वर, पणजी या संस्थेमार्फत या नाटकाचे प्रयोग गावोगावी होत आहेत यातच या नाटकाचे श्रेय आहे . हे नाटक काहीना पचतं आणि काहीना पचत नाही, या संदर्भात नाटककार तुकोबांच्या शब्दांत सांगतात,"सत्य असत्यासी मन केले ग्वाही | मानीयले नाही, बहुमता ||"

नाटकाचा इतिहास लक्षात घेतला तर जाणवतं की नाटककार वाघ सुद्धा तुकोबा सारखेच स्पष्ट वक्ते आणि प्रसंगी प्रखरतेने सुनावणारे होते. तुकोबांचे विचार बासनात बंदिस्त राहू नये तर त्याचे थोडे तरी किरण लोकांप्रती पोहोचावे, या एकमेव हेतूने या नाटकाची निर्मिती झालेली आहे.

**'तुका अभंग...' नाटकातील 'तुकाराम'**

'तुकाराम' हा मराठी मातीतून उभा झालेला एक उत्तुंग मानदंड आहे. काळाचाही पडदा भेदून अभंग स्वरूप बनलेला एक असामान्य महाकवी आहे. जनसामान्यांना तुकोबा परिचित आहे. तो एक संत म्हणून, विठ्ठलाचा एक भक्त म्हणून, पण याही पलीकडे तुकोबा आहेत. तुकाराम म्हणजे विचारांचे एक पर्व आहे. त्यांचे विचार समाजहिताचे होते. देहू गावात जेव्हा अन्नाचा दुष्काळ पडतो तेव्हा आपल्या घरातील धान्य तुकोबा गावकऱ्यांना वाटतो. स्वतःच्या बायकोचा अन् मुलाबाळांच्या पोटाचा विचार न करता धान्याचा कण कण तो दान करतो. यावरून त्यांचा समाजहितवादी दृष्टीकोन लक्षात येतो. तुकाराम हा खऱ्या अर्थाने समाजसेवक होता. शूद्रा ति शूद्रांचा तो नायक होता.

बहुजन समाजाच्या हितासाठी झगडणारा तो एक जननायक होता. समाजातले अज्ञान त्यांना दूर सारायचे होते म्हणून नाटकात त्यांनी अज्ञानरूपी काटेरी निवडुंग बेनण्यासाठी हातात कोयता घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. समाजहितासाठी त्याने वीणा, चिपळया हाती घेतल्या अन कीर्तनाचा गजर केला. नामदेवाने जागृत केल्यावर समाजहीतोस्तव अभंग रचना केली. लोकपरंपरेनुसार तुकाराम हा एक अवतारी पुरुष होता. कायम भक्तीच्या तंद्रीत असलेला हळुवार आणि एकसूरी आवाजात सतत कळवळून पांडुरंगाचे नाव घेणारा, उच्चवर्णीयांनी केलेले अपमान मुकाटपणे सोसणारा अशी तुकारामांची बाळबोध, अव्यवहारी प्रतिमा लोकांच्या मनात ठसली गेली आहे. अनेक चमत्कार तुकारामाला चिकटवले गेले आहेत. पण खरा तुकाराम याहून वेगळा आहे. तो बंडखोर प्रवृत्तीचा होता. अन् त्याच्या स्वभावातल्या याच बंडखोरीचे दर्शन या नाटकात घडविले आहे. या नाटकातला तुकाराम विद्रोही आहे. त्याने कर्मकांड, जातीभेद, उच्चवर्णीयांचे वर्चस्व, याचा जाहीरपणे विरोध केला आहे. या नाटकात तुकारामांच्या तोंडी घातलेल्या संवादातून या विद्रोहाची प्रचिती आल्या वाचून राहत नाही.

उदा "आग लावा तुमच्या अधिकाराला! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, कोणी केले हे भेदाभेद? कोणी केली ही विभागणी? ब्राह्मणानेच ओम म्हणावं आणि शूद्रानी म्हणू नये हा दंडक कोणी घातला रे भटा?शास्त्र, पुराण लिहायला तो वरचा देव खाली आला होता का रे की तुमच्या ढोंगी वाडवडिलांनी स्वतःची तुंबडी भरण्यासाठी हे थोतांड करून ठेवलंय?" आपण बुजून उगी बसतो त्याचा फायदा उठवला या लोकांनी, धर्माला बांधून ठेवलं आपल्या जानव्यात..." असे समाज रचनेबाबत आणि जातिभेदाबाबत विद्रोही स्वर अनेक ठिकाणी नाटकात क्षणोक्षणी उमटलेले आहे. पण हा विद्रोह समाज सुधारण्यासाठी होता हे लक्षात घेतले पाहिजे. तुकाराम हा एक समाजसुधारक होता हे प्रकर्षाने या नाटकात जाणवते. जातीची चौकट मोडायला निघालेला तुकाराम या नाटकात दाखविलेला आहे. शास्त्रामधल्या भाकडकथांच्या कुंपणावर तुकारामाने लाथ मारलेली आहे. त्याच्या अनेक अभंगातून नाटकात बहुजन समाजाची संवेदना बोलते. उदा "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने...","आपुलिया बळे नाही बोलवत, सखा कृपावंत वाचा त्याची...","सुदिन सुवेळ | तुझा मांडीला गोंधळ वो...","आम्ही

वैकुंठवासी...”इत्यादी.

तुकारामाने दिन दलितांच्या सामाजिक आणि आत्मिक उन्नयनासाठी स्वतःच्या जीवाचे रान केले. त्या छळालाही तुकारामाने निर्भयपणे तोंड दिले. निर्भीडपणे समाजाचे त्याने नेतृत्व केले. आपल्या कविता मधून पाखंड्यावर प्रहार केला.उदा “ऐसे कैसे झाले भोंदू...”, “अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड...”, “मऊमेणा हुन आम्ही विष्णुदास...” इत्यादी.

या नाटकातील तुकाराम म्हणजे एक चालते बोलते व्यासपीठ आहे. ज्याने कीर्तनातून मार्गदर्शन केले. समाजाला एक दिशा दिली अन जातीभेदाला मूठमाती दिली. आपल्या परखड बोलातून खऱ्या अर्थाने तुकाराम हा योगनायक ठरतो. “अणुरेणू या थोकडा परी आकाशाएवढा” असा हा तुकाराम केवळ आपल्या वाणीतून समाज सुधरवतो. समाज सुधारण्याची आंतरिक भूकठाई ठाई जाणवते. काळाच्या अथांग डोहात लपलेल्या तुकारामाच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा शोध येथे नाटककार घेतात. हा शोध नुसता वरवरचा नसून तो जाणीवेच्या पलीकडे जाऊन घेतलेला आहे. हा एक वङ्मयीन शोध आहे. येथे दर्शविलेला बंडखोर वृत्तीचा तुकाराम हा काल्पनिक नसून तो त्याच्याच वांङ्मयातून साकारलेला आहे. अनुभव संपन्न असा हा तुकोबा बोल्होबा आंबिये म्हणजे खऱ्या अर्थाने एक युगपुरुष आहे.

**‘तुका अभंग...’ नाटकातील सामाजिक संस्कृती**

या नाटकात तुकोबाच्या जळजळीत रूपाचे दर्शन घडत असताना त्यासोबतच तत्कालीन समाज आणि त्या समाजाची मानसिकता यावरही नाटककाराने प्रकाश पाडला आहे. एका बाजूला प्रचंड ताकदीचे व्यक्तिमत्व तुकोबाच्या रुपात रेखाटत असताना तत्कालीन समाजाला नाटककाराने कुठेच वेगळे केलेले नाही. तत्कालीन समाजाचे दर्शन तुकोबाच्या व्यक्तिमत्त्वातून घडत जाते. या नाटकात दर्शविलेले तुकोबांचे वाङ्मय व्यक्तिमत्व परखड विद्रोही अन् बंडखोर आहे. त्यातूनच तत्कालीन समाजाचे दर्शन घडते.तुकोबांच्या वाङ्मयातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू ठसठशीतपणे या नाटकात उमटविलेले आहेत. ढोंगी साधूनी वाजवलेल्या स्तोमाबाबत तुकाराम खडसावून सांगतात “जैसे कैसे झाले भोंदू, कर्म करनी म्हणती साधू...”,

"अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड, काया त्यासी रांड प्रसवली" इत्यादी.तुकोबांच्या या वांङ्मयीन निर्मिती मधून तत्कालीन समाजात उच्चवर्णीयांचा अधिकार अन् त्यानी माजवलेले स्तोम, तसेच समाजाच्या मातीत मूळ धरून बसलेला जातीभेद इत्यादींची कल्पना आल्या वाचून राहत नाही.या संदर्भात सदर नाटकाचे दिग्दर्शक देविदास शंकर आमोणकर यांचे मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "हे नाटक जरी तुकाराम महाराजांच्या जीवनावर बेतलेले असले तरी हे नाटक ऐतिहासिक नाही. ते सातत्याने समाजात चालणाऱ्या प्रस्थापित विरुद्ध शोषित यांच्या संघर्षाचे प्रतिनिधित्व करणारे प्रातिनिधिक नाटक आहे."या नाटकातील रामेश्वरांच्या धर्म पिठाच्या प्रवेशातूनही तत्कालीन समाजातील भोंदूगिरीचे दर्शन घडते. तत्कालीन समाजात भटा बामणांची मक्तेदारी चालायची. याची प्रचिती नाटकाच्या सुरुवातीलाच येते. जेथे पितरांचे श्राद्ध घालायला तुकाराम बसतात अन् ब्राह्मण त्यांच्या घरी ॐकाराचा घोष करत नाही. का? तर तुकोबा शूद्र कुळात जन्मलेले. जातीभेदाचे हे कुंपण मोडण्यासाठीच तुकोबा परखड वाणीत सुनावतातकी "मी लाथ मारीन, तुम्ही घातलेल्या मर्यादेवर. शास्त्रामधल्या भाकडकथांची कुंपण घालून तुम्ही कोंडून ठेवलाय आम्हाला, बंदिवान करून ठेवलंत, मला मोडायचं हे कुंपण." या संवादावरून तत्कालीन समाजाला लागलेली जातीभेदाची वाळवी दिसून येते. जी पोखरत जाते संपूर्ण समाज. नाटकांच्या शेवटपर्यंत मंबाजी आणि काही तत्कालीन ब्राह्मण मिळून तुकोबाची हत्या करतात अन् गावात येऊन अफवा पसरवतात की श्री विष्णूंचे पुष्पक विमान आले अन् तुकोबा त्यात बसवून सदैव वैकुंठाला गेले. तत्कालीन समाज या भाकड कथेवर विश्वास ठेवतो कारण तत्कालीन समाजात कर्मकांड आणि धर्माचे स्तोम खूपच माजले होते. देवाच्या नावाला श्रद्धेचा लेप लावून कोणतीही भाकडकथा समाजात खपवली जायची आणि तत्कालीन समाज या भाकडकथांना बळी पडायचा. पण तुकोबाची पत्नी मात्र या फसवणुकीवर विश्वास ठेवत नाही. तुकोबाला अंतरबाह्य ओळखणारी जिजाई खडसावून सांगते, "भटजी, गोसावड्यांनो, तुमच्या अंगाला वास येतोय माझ्या तुकोबाच्या रक्ताचा, पण लक्षात ठेवा तुम्ही लाख खेळा, मारलात तरी तुकोबा मरणार नाही.." असा हा तुकोबा सदैव अभंगच राहील.

**निष्कर्ष:**

नाटककार विष्णू सूर्या वाघ लिखित 'तुका अभंग अभंग' हे कधीही भंग न पावणारे नाटक आहे. तुकोबा तर आपल्या अभंगातून अभंग आहेतच. त्याचप्रमाणे 'तुका अभंग अभंग' ही नाट्यकृती देखील नावाप्रमाणेच अभंग आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वीचा विषय पण आजच्या आधुनिकतेच्या काळातही वादग्रस्त ठरावा? म्हणजे समाज अजूनही जातीभेदातच आहे. आपण खरेच आधुनिक काळात जगतो आहोत का? विज्ञानाची कास धरून माणूस पृथ्वीवरून चंद्राची सफर करतो. आणि आपण आजही वर्णभेद पाळतो. या प्रश्नावर गांभीर्याने विचार व्हायला हवा. जातीभेद ही समाजाला लागलेली कीड आहे. प्राचीन काळात अनेक संतानी ही कीड संपवण्याचा प्रयत्न केला. पण आजही समाजात जातीभेदाची किड प्रकर्षाने समाज गिळंकृत करत चालली आहे. तुम्ही कितीही माणुसकीचे मुखवटे घालून सभ्यतेचा आव आणलात तरीही आजच्या काळात जातीभेद वर्णव्यवस्था यासारख्या विषयावरून "तुका अभंग अभंग" वादग्रस्त ठरते यावरूनच लक्षात येते की समाजात जातीभेदाच्या निवडुंगाचे रान आजही पसरलेले आहे. तुम्ही कितीही नाकारलत पण 'तुका अभंग अभंग'ची वादग्रस्तताच याचा पुरावा आहे. जातीभेद हयात नसता तर कदाचित 'तुका अभंग अभंग' वादग्रस्त ठरले ही नसते. जातीभेदाच्या निवडुंगाचे रान बेनण्यासाठी वाघाने या नाटकाच्या रूपात धारदार कोयता हाती घेतलाअन् आपल्याला या कोयत्याची धार कायम धारदार ठेवायची आहे.

## संदर्भ सूची:


1. वाघ, विष्णू, तुका अभंग अभंग, पार्थ प्रकाशन, २०००.
2. मडगावकर, विनय, तिसऱ्या सहस्त्रकारंभी भारतीय नाटक आणि नाटककार, संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन, ताळगाव –गोवा,२०२१.



**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.